माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ८८/२०२३**

**तक्रारकर्ता, श्रीम. प्रमिला श्याम गभने,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा इमारत अभियंता (पश्चिम)**
**नागपूर सुधार प्रन्यास, सदर नागपूर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा अभियंता (पश्चिम)**
**नागपूर सुधार प्रन्यास, सदर नागपूर**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २७.०९.२०२३**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : अनुपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : अनुपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| १९.०९.२०२२ | --- | २०.०३.२०२३ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २५७/२०२१ मध्ये दिनांक १९.०९.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २७.०९.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणी सूचना उपअभियंता, नगर रचना, महानगरपालिका, नागपूर व सहायक अभियंता, नगर रचना महानगरपालिका, नागपूर यांना निर्गमित करण्यात आली असून नागपूर सुधार प्रन्यास यांना सुनावणी सूचना निर्गमित करण्यात आली नव्हती . आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा इमारत अभियंता (पश्चिम), नागपूर सुधार प्रन्यास, सदर नागपूर अनुपस्थित असून उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, नागपूर, श्री. मंगेश सु. गेडाम आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा

माहिती आयोग खंडपीठ

अभियंता (पश्चिम) नागपूर सुधार प्रन्यास, सदर नागपूर अनुपस्थित असून नगर रचनाकार, नगर रचना, महानगरपालिका, नागपूर श्री. ॠतुराज जाधव उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. २५७/२०२१ मध्ये दिनांक १९.०९.२०२२ रोजी सुनावणी घेवून " नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्या दिनांक १७.१२.२०२० रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने गोरले ले आऊट येथील भुखंड क्र. ३७, ख. क्र. १११/२,११४ या भुखंडा संबंधितील इमारत अभियंता (पश्चिम), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती तसेच अपिलार्थी यांनी जोडपत्र-अ मध्ये मागितलेली माहिती त्यांनी वरील आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत अपिलार्थीस विनामुल्य प्रदान करण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी ," या आदेशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २०.०३.२०२३ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. व्दितीय अपिल क्र. २७५/२०२१ मध्ये दिनांक १९.०९.२०२२ रोजी पारित आदेशानुसार अपिलार्थी यांनी दाखल माहिती अर्जात मौजा परसोडी येथील ख. नं. १११/२ व ११४ येथील प्लॉट नं. ३७ चा संपूर्ण ले-आऊटचा मंजूर नकाशा, गोरले ले-आऊटचा मंजूर नकाशा मिळण्याबाबत मागणी केलेली आहे. वरील धारीका विशेषत: भुखंड ३७ ख. नं. १११/२ व ११४ याबाबत अधिक माहिती इमारत अभियंता (पश्चिम), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडे असण्याची शक्यता लक्षात घेता, इमारत अभियंता (पश्चिम), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडे उपलब्ध संपूर्ण माहिती त्यांना वरील आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत प्रदान करावे, असे आदेशित करण्यात आले.

मात्र नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्यावतीने अपिलार्थी, श्रीम. गभने यांना पुरविण्यात आलेला नकाशा हा मंजूर नकाशा नसून अर्जदाराने सादर केलेले नकाशा कागदपत्राच्या आधारे तयार करण्यात आलेले भुखंडाचे अंदाजे रेखांकन आहे. ह्या रेखांकनाचे नियमितीकरण महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन ठरणे श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ च्या कलम ३ (२) च्या अधिन आहे.नकाशात व मोक्यावरील स्थितीत तफावत संभवत असल्याने ते अंतिम नसून भुखंडाचे क्षेत्रफळ, आकार, भुखंडाचा क्रमांक व संख्या रस्त्याची रुंदी यामध्ये बदल होऊ शकता, असे अपिलार्थी यांना सादर केलेल्या नकाशात दिसुन आले. अपिलार्थी यांना प्रत्यक्षात जोडपत्र-अ मधील माहिती अद्याप अप्राप्त असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. नागपूर सुधार प्रन्यास यांच्या वतीने दि. १७.१२.२०२० रोजी गोरले-लेआऊट भुखंड ३७ ख. नं. १११/२ व ११४ या भुखंडाची वैयक्तिक धारीका अभिलेखात उपलब्ध असून प्रस्तुत भुखंड तसेच लेआऊट यांचे नियमितीकरण महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन ठरणे श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ च्या कलम ३ (२) नुसार अपिलार्थी यांना पाठविण्यात आली आहे. ही, बाब लक्षात घेता, आयोगाने पारित केलेल्या दि. १९.०९.२०२२ रोजीच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांना माहिती अद्याप अप्राप्त आहे. संबंधित प्राधिकरण, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी मौजा, परसोडी